# समानतेच्या वाटेवरचा पुरोगामी कायदा

**कोणतेही खासगी कायदे, तरतुदी, नियम जर सर्वसामान्यांवर अन्याय करत असतील तर ते त्या त्या समाजानेच बदलायला हवेत, अन्यथा त्यात सरकारी हस्तक्षेप अपरिहार्य आहे. तिहेरी तलाकविरोधी कायदा म्हणजे स्त्री-पुरुष असमानता दूर करण्याच्या वाटेवरचे महत्त्वाचे पाऊल आहे.**





अॅड. नयना परदेशी
कायदेतज्ज्ञ
zeemarathidisha@dnaindia.net

'तिहेरी तलाक विधेयक' म्हणजेच 'मुस्लीम महिला (विवाह अधिकार संरक्षण) विधेयक २०१९' राज्यसभेने बहुमताने मंजूर केले. सरकारने हे विधेयक मंजूर करण्याची गरज, हे विधेयक काय आहे आणि त्याला झालेला विरोध कशासाठी, हे सर्वच प्रश्न विचारात घेण्याची गरज आहे.

अल्पसंख्याक आणि त्यातही महिला यांच्यासाठी कोणताही कायदा झाला की सरकारच्या हस्तक्षेपाची चर्चा सुरू होते. मात्र एक बाब विचारात घेतली पाहिजे, की जेव्हा जेव्हा कुठल्याही कायद्याने, कृतीने सर्वसाधारण लोकांच्या हक्कांना बाधा पोचते, त्यांच्यावर अन्याय होतो आणि सामाजिक सुधारणांच्या माध्यमातून त्यावर उपाय केले जात नाहीत, त्या त्या वेळी सरकारी हस्तक्षेप अनिवार्य ठरतो. तेच या विधेयकाबाबत झाले आहे!

मुस्लीम समाजात तीन प्रकारचे तलाक आहेत- १) एहसान २) हसन आणि ३) तलाक-ए-बिद्दत! यातील पहिले दोन तलाक हे रद्द करण्याजोगे (revocable) आहेत, तर तलाक-ए-बिद्दत रद्द न करण्याजोगा (irrevocable) आहे. तिहेरी तलाक तोंडी, इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे, पत्राद्वारे सहजतेने दिला जाई. हा तलाक 'इन्स्टंट तलाक' किंवा 'तत्काळ घटस्फोट' म्हणूनच परिचित आहे. 'तिहेरी तलाक'मुळे मुस्लीम महिला सदैव दहशतीखाली वावरत असतात. गेल्या कित्येक वर्षांत अनेक सुधारणा झाल्या तरी मुस्लीम समाजातील पुरुषी वर्चस्वामुळे तिहेरी तलाकबाबत कोणतीही सुधारणा केली गेली नाही. त्यामुळे मुस्लीम महिलांच्या मोठ्या गटावर प्रचंड अन्याय होत राहिला. म्हणूनच सरकारला यात हस्तक्षेप करणे भाग पडले.

सर्वोच्च न्यायालयाने शायरा बानो केसमध्ये पुरोगामी निकाल देत इन्स्टंट तिहेरी तलाक असंवैधानिक (unconstitutional) ठरवला आणि एक पाऊल पुढे टाकले. शायरा बानोला तिच्या नवऱ्याने १५ वर्षांनंतर एका पत्राद्वारे तिहेरी तलाक देऊन सोडून दिले होते आणि तिला न्यायालयाचे दरवाजे खटखटावे लागले होते. या संदर्भात कोणत्याही पुरुषाने कधी याचिका केली नाही. म्हणजे या विषयावर मुस्लीम समाजात कोणतेही विचारमंथन होत असल्याचे आणि कारवाई करत असल्याचे दिसले नाही. त्यामुळेच मुस्लीम स्त्रियांसाठी समानता, लैंगिक समानता (gender equality) आणि सन्मान यासाठी सरकारने हस्तक्षेप करत तिहेरी तलाक विधेयक मंजूर केले आहे. आता यावर राष्ट्रपतींची मोहोर उठणे आणि सरकारतर्फे गॅझेटमध्ये तसे जाहीर करणे, एवढीच औपचारिकता राहिली आहे.

'हे विधेयक म्हणजे आमच्या खाजगी कायद्यांमध्ये (पर्सनल लॉ) हस्तक्षेप आहे,' अशी ओरड होत आहे. मात्र हे लक्षात घ्यायला हवे, की कोणतेही खासगी कायदे, तरतुदी, नियम जर सर्वसामान्यांवर अन्याय करत असतील तर ते त्या त्या समाजानेच बदलायला हवेत, अन्यथा त्यात सरकारी हस्तक्षेप अपरिहार्य आहे. आपल्या संविधानामध्ये दिलेल्या समानता, सन्मानाने जगण्याचा अधिकार अशा अनेक अधिकारांशी सुसंगत असे कायदे करण्यास सरकार बांधील आहेच, शिवाय स्त्रियांसंदर्भात CEDAW या आंतरराष्ट्रीय करारानुसारही स्त्रिया व पुरुष यांच्यामधील असमानता दूर करण्यासाठी आपण बांधील आहोत. हा कायदा म्हणजे स्त्री-पुरुष असमानता दूर करण्याच्या वाटेवरचे महत्वाचे पाऊल आहे.

असा कायदा करणारा भारत हा काही पहिला देश नाही, तर मुस्लीमबहुल किंवा मुस्लीम बहुल अशा पाकिस्तान, इजिप्त, ट्युनिशिया, श्रीलंका, बांग्लादेश, टर्की, इंडोनेशिया आणि इराक या राष्ट्रांमध्येही 'तिहेरी तलाक'ला बंदी असून तिथे 'आमच्या खाजगी कायद्यात ढवळाढवळ होते आहे' हे म्हणणे मान्य झालेले नाही, हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

मुस्लीम महिला (विवाह अधिकार संरक्षण) विधेयक २०१९ हे नक्की काय आहे आणि त्याला अनेकांचा विरोध का आहे, हेही समजून घेणे गरजेचे आहे. या विधेयकानुसार एखाद्या पुरुषाने आपल्या पत्नीला तिहेरी तलाक दिला तर ती स्त्री किंवा तिचे रक्ताचे नातेवाईक अथवा लग्नानंतरचे नातेवाईक तिच्या संमतीने पोलिस ठाण्यात तक्रार (प्रथम खबरी अहवाल) नोंदवू शकतात. म्हणजेच तिहेरी तलाक हा आता फौजदारी गुन्हा असून हा गुन्हा दखलपात्र आणि अजामीनपात्र आहे. आरोपीला जामीन दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयातून आरोपी आणि पीडित स्त्रीची बाजू ऐकल्यानंतरच मिळू शकतो. तसेच, हा गुन्हा compoundable म्हणजेच आपापसात समझोता करून मिटवता येणारा असून त्यासाठीच्या अटीशर्ती माननीय दंडाधिकाऱ्यांनी ठरवण्याची तरतूद आहे. हा गुन्हा सिद्ध झाल्यास तीन वर्षांपर्यंत तुरुंगवासाची आणि दंडाची तरतूद आहे. पीडित स्त्रीला आरोपी पतीकडून स्वतःसाठी आणि मुलांसाठी भत्ता मागण्याचा तसेच मुलांचा ताबा मागण्याचा अधिकार आहे. मात्र भत्त्याची रक्कम तसेच ताबा देण्याची पद्धत दंडाधिकारी ठरवतील.

फौजदारी गुन्हा आणि तुरुंगवासाची शिक्षा यामुळेच या कायद्याला जास्त विरोध होत असून नेहमीप्रमाणेच त्याचा गैरवापर होण्याची भीती दाखवायला सुरुवात झाली आहे. त्याचबरोबर आणखी एका गोष्टीचा विचार व्हायला हवा, ती म्हणजे- कोणत्याही धर्माच्या स्त्रियांना कायद्यानुसार दिलेली पोटगी, भत्ता, नुकसानभरपाई सर्वसाधारणपणे मिळणे दुरापास्त असते. असे असताना दंडाधिकाऱ्यांनी पीडित स्त्री व तिच्या मुलांना भत्ता देण्याचा आदेश दिला तरी नवरा तुरुंगात गेला किंवा जाणार असेल तर तो आदेश अमलात कसा येणार, हा एक वेगळाच प्रश्न आहे. त्याच्यावरही चर्चा होणे अगत्याचे आहे. मुस्लीम महिला आणि इतर अनेक गट या कायद्यातील गुन्हेगारी तरतुदींच्याही विरोधात आहेत, कारण त्यांना नवऱ्याला तुरुंगात टाकण्यापेक्षा त्यांचे वैवाहिक अधिकार जपण्यात जास्त रस आहे. तसेच, मुस्लीम महिलांना तलाक हवा असेल तर काय तरतुदी असाव्यात, याचाही विचार व्हायला हवा, जो या कायद्यात दिसत नाही. कारण त्यांना लवकर घटस्फोट हवा असेल तर 'खुला' (तलाक) घेऊन सर्व हक्कांवर पाणी सोडावे लागते.

हा पुरोगामी कायदा करून समानतेच्या वाटेवर आपण एक पाऊल पुढे टाकलेले आहे आणि त्यामुळे पुरुषप्रधान संस्कृतीमधील पुरुषांच्या मनात भीती निर्माण झाली आहे, यात शंकाच नाही. त्याचवेळी या कायद्याची योग्य पद्धतीने व त्वरित अंलबजावणी होण्याकडे तितकेच लक्ष देण्याची गरज आहे.